International Journal of Advance and Applied Research (IJAAR)    ISSN – 2347-7075
Peer Reviewed    Bi-Monthly    Impact Factor – 0.899
Vol.2 No.2 Nov - Dec 2014

# ग्रामीण समाजातील मनोरंजन : एक समाजशास्त्रीय दृष्टीक्षेप

**प्रा. बोरवडेकर शरद नामदेव**

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,*

*गोपाळ कृष्ण गोखले महाविदयालय, कोल्हापूर.*

**प्रस्तावना:**

२१ व्या शतकातील देशाचा विकास विज्ञान-व प्रगत तंत्रज्ञानावर आधारित आहे असे असेब लरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उदयच मानवी विचारशक्तीतून झाला आहे. मानवाने या विचारसरणीला जशी कलेची जोड दिली, तशी मनोरंजनाची जोड देऊन वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आपला विकास घडवून आणला. या मनोरंजनाचे मुळ मात्र ग्रामीण संस्कृती आहे, मानवी संस्कृती ही प्राचीन असून अगदी सुरवातीपासून तिचे स्वरूप ग्रामीण संस्कृती' असेच होते. विविध मनोरंजनाच्या कला मानव निसर्गाकडून शिकला.

पाश्चिमात्य समाजशास्त्रीय विचारवंत रॉबर्ट रेडफील्ड, ए.एल. कोबर यांनी मानवी समाजाचे तीन खंडात विभाजन केले. त्यात नागरी समाज, कृषक समाज, जनजातीय समाज असे मानवी समाजाचे केलेले विभाजन अन्य कोणत्याही देशाला पुरेपूर्ण लागू होत नसले तरी भारतीय समाजास ते नक्की लागू होते. या विवेचनात त्यांनी एक मत मांडले ते म्हणजे, नागरी सामाज आणि जनजातीय समाजपेक्षा कृषक समाज हा अतिप्राचीन,स्वयंपूर्ण समरूप विकुरलेला आणि स्वंय नियंत्रण कर्ता असा आहे. आणि असे असण्याचे कारण म्हणजे 'शेती-हा प्रमुख व्यवसाय व यातून विकसित केलेले मनोरंजन म्हणून भारतीय समाजव्यवस्थेत ग्रामीण केलेला जेवढे महत्व आहे तेवढेच अनन्यसाधारण महत्त्व मनोरंजकाला आहे. प्रस्तुत लेख हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित ग्रामीण समाजातील मनोरंजनाचे प्रकार, त्याचा परिचय समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे हे प्रस्तुत लेखाचे प्रमुख उद्दिष्ट्चे आहे. प्रस्तुत लेखाची विभागणी -दोन गटात केली आहे. पहिल्या विभागात ग्रामीण समाजातील मनोरंजनाचा परिचय करण्यात आला आहे तर दुसऱ्या विभागात ग्रामीण समाजातील मनोरंजनाचे प्रकार विषद केली आहेत. ग्रामीण भागांतही खेळला जातोय. नुकत्याच गाजून गेलेल्या 'लगान' सिनेमातील ग्रामीण चमूने इंग्रजांविरुद्ध जिंकलेल्या क्रिकेट मॅचचा परिणाम ग्रामीण तरुणांवर निश्चित झाला आहे. याखेरीज खेडोपाडी काहीसे भिन्न प्रकारचे खेळ खेळले जात असतील यात शंका नाही.

**ग्रामीण मनोरंजन परिचय:**

आपल्या रोजच्या जीवनाचे रहाटगाडे सुरू असताना तोचतोचपणा येतो, त्यामुळे बऱ्याचदा जीवन कंटाळवाणे होते. फावला वेळ कसा घालवावा ह्यावर आपण विचार करतो. तसेच ताणतणावाच्या जीवनात थोडे ताजतवाने वाटण्यासाठी आपल्या संस्कृतीने काही रूढी व परंपराही अवगत केलेल्या आपणांस आढळतात. ह्या सर्व दृष्टिकोनातून आपणांस मानवी जीवनात विविध मनोरंजनाचे प्रकार आढळतात. मनोरंजन हे विरंगुळयासाठी असते. त्यास संस्कृतीची जोड आहे. तो एक संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. संस्कृतीचा विकास होत असताना मनोरंजनाच्या साधनांतही विकास होत असताना आढळतो. आपणांस ह्याची प्रचिती विभाग ६.२.२ वरून आलीच असेल.

पूर्वी मनोरंजनाची साधने ही शहरी व ग्रामीण भागात वेगळी असत. आधुनिक युगात इलेक्ट्रॉनिक्सची विविध उपकरणे उपलब्ध असताना मात्र पूर्वी असलेला हा फरक कमी-कमी होत चालला आहे. रेडिओ तर आता सर्वत्र आढळतो. टेलिव्हिजन व व्हिडिओ प्लेअरसुद्धा आता ग्रामीण भागात आढळतात. परंतु ह्याचे प्रमाण फार कमी असते. दूरचित्रवाणी संच (Television) हा पूर्ण भागात एखादाच आढळतो, तोही पंचायतीच्या ऑफिसतर्फे गावात दाखविला जातो. परंतु तांत्रिक ज्ञानाच्या उणिवेमुळे तो जर बिघडला तर तसाच पडून राहतो. अशा ह्या आधुनिक साधनांच्या उपयोगास फार मर्यादा पडतात. तेव्हा भारतीय खेड्यांमध्ये मनोरंजनाच्या बाबतीत समाजात प्रचलित असलेले मनोरंजनाचे प्रकारच महत्त्वाचे ठरतात.

**ग्रामीण समाजातील मनोरंजनाचे प्रकार:**

सर्वसाधारणपणे खालील मनोरंजनाचे प्रकार ग्रामीण समाजात आढळतात.

(१) तमाशा, नाटक

(२) गोंधळ

(३) पोवाडे, भारूड व गाणी

(४) कीर्तनकार व भजनी मंडळे

(५) बहुरूपी

(६) डोंबारी / कोल्हाटी यांचे कसरती खेळ

(७) लोकनृत्य

(८) कथाकथन

(९) स्थानिक उत्सव / महोत्सव

इत्यादी. ह्या प्रकारांची माहिती घेऊ या.

(१) **तमाशा, नाटक** : तमाशा हा प्रकार प्रामुख्याने महार, मांग, गोंधळी, इत्यादी जातींतील लोक सादर करतात. तमाशातील हे कलाकार ग्रामीण भागातील भाषा वापरून ग्रामीण संवाद मांडतात. त्यात नाचगाणी तसेच अश्लील संवादांचा समावेश असतो त्यात गणगवळण व वग हे प्रकार आढळतात. ग्रामीण हौशी कलाकार एकत्र येऊन एखादे नाटक गावातील सणासुदीला किंवा जत्रेत सादर करतात. परंतु नाटकाची लोकप्रियता ग्रामीण भागात कमी आहे.

(२) **गोंधळ :** गोंधळी लोक देवीचे पुजारी असतात.ते देवीच्या नावाने जागर करतात, त्यालाच आपण गोंधळ घालणे म्हणतो. ह्या कार्यक्रमात देवीच्या गौरवाची गाणी म्हटली जातात. गाताना त्यास संगीत व वाद्यांची जोड असते. तुणतुणे व संबळ ही वाद्ये वाजविली जातात. रात्रभर हे कार्यक्रम चालतात. लग्नकार्य किंवा मौंजीबंधनासारख्या समारंभासाठीसुद्धा गोंधळ घालतात. गोंधळाशिवाय हे लोक वाद्याच्या आवाजाच्या किंवा हाताच्या खाणाखुणांनी (करपल्लवी) एखाद्याचे नाव ओळखू शकण्याचा मनोरंजनाचा कार्यक्रमही करतात.

(३) **पोवाडे, भारूड व गाणी:** पोवाडे हे शाहीर गातात; तर भारूड हे भराडी लोक गातात. पोवाडे हे विशेषतः ऐतिहासिक घटनांचे दर्शन घडवितात. एखाद्या व्यक्तीचे उदाहरणार्थ, शिवाजी, यशवंतराव चव्हाण अशा मोठ्या व्यक्तिमत्त्वांचा जीवनपट ते पोवाड्यांतून मांडतात. भारुडांतून रोजच्या जीवनाच्या मानवी संबंधांतील घटनांवर आधारित गाणी म्हटली जातात. हे प्रकार सोडून सध्या प्रचलित असलेला मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणजे हौशी गायकांनी गायलेली गाणी.

(४) **कीर्तनकार व भजनी मंडळी:** कीर्तनकार हे खेड्यांतून हिंडतात व तेथे कीर्तनाचे कार्यक्रम करीत असतात. धार्मिक दृष्ट्या ह्या कार्यक्रमांना महत्त्व दिले जाते. त्यांतून परमेश्वराचे गुणगान केले जाते. त्याच्या नामाचा महिमा वर्णन केला जातो. त्याचप्रमाणे खेड्यांतून भजनी मंडळे स्थापून विशिष्ट दिवशी भजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. उदाहरणार्थ, गुरुवारी दत्ताचा दिवस, अंबाबाई, सप्तश्रृंगी देवीचा मंगळवार व शुक्रवार अशा दिवशी भजने गायली जातात. कीर्तन हा प्रकार सध्या आधुनिक विकास कार्यक्रमात उद्बोधनासाठीसुद्धा वापरला जातो. उदाहरणार्थ, कुंटुंब नियोजन, लोकसंख्या नियंत्रण, इत्यादी.

(५) **बहुरूपी :** बहुरूपी म्हणजे भोरपी, रामानंद, किंवा भवय्ये. हे अत्यंत कुशल कलावंत असतात. ते खेड्यांमधून ३-४ च्या गटाने मुक्काम करतात व तेथे अर्धनारीनटेश्वर, बाळंतीण, फौजदार, शिपाई, इत्यादी सोंगे घेतात आणि हुबेहूब नक्कल करतात त्यातून ते गमती व विनोद निर्माण करुन मनोरंजन करतात.

(क) **दाँयारी कोसाटा ह्यांचे कसरती खेळ:** हे लोक कसरतीची कामे करतात कोल्हाट्या उड्या, तारेवर चालणे, दोरीवरचे कामे,इत्यादी कसरतीची कामे ते करून दाखवितात त्यातून ते नाचत मझ्झा करतात. डोंबारी व कोल्हाटी यांच्याशिवाय इतर नंदीवाले,माकडवाले व अस्वलवाले हे त्यांचे नावानुरुप प्रत्यक्ष प्राणी घेऊन लोकांची करमणूक करीत असतात.

**(७) लोकनृत्य :** धार्मिक समारंभाच्या वेळी मुले-मुली मिळून एखादे लोकनृत्य सादर करतात. उदाहरणार्थ, नागपंचमीला स्त्रिया फेरीची गाणी म्हणतात. काही ठिकाणी पुरुष व स्त्रिया एकत्रितही लोकनृत्य करताना दिसतात. आजकालच्या काळात विशेषतः नवरात्र व गणेशोत्सव आणि देवीच्या कार्यक्रमांत असे लोकनृत्य प्रकार आढळतात.

**(८) कथाकथन:** खेड्यांत संध्याकाळी सर्व लोक एकत्र जमून त्यातील एखादी व्यक्ती कथा सांगते व त्यातून मनोरंजन करतात. तसेच घरात वृद्ध लोक मुलांना कथा सांगतात. ह्यात उखाणे व दंतकथा सांगण्याचा प्रकारही आढळतो.

(९) **स्थानिक उत्सव व महोत्सव:** प्रत्येक गावात ग्रामदैवते असतात. त्याच्या नावाने विशिष्ट दिवशी वार्षिक महोत्सव असतात त्यात धार्मिक भावनेने सर्व लोक उत्सव साजरा करतात उदाहरनार्थ, उरुस त्र्यंबकेश्वर येथील श्रावण महिन्यातील उत्सव, गाणगापूर यत्रा, वणीच्या देवीची यात्रा, इत्यादी, ग्रामीण लोक ह्या यात्रा निमित्ताने एकत्रित येतात. परंपरागत लोककलेविषयी मधुकर वाकोडे ह्यांनी नाशिक येथील लोककला साहित्य संमेलन अहवालात १९९५ साली मॉडेलला कलेची रुपरेषा आपणास अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची आहे. महाराष्ट्रातील कितीतरी लोककला प्रकार कलात्मक, प्राकृतिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये टिकवून आहेत त्या त्या प्रदेशातील प्रकृतीचे रंगढंग जपून त्यांनी माणसांच्या कृतीप्रवृतीना सुखर करून टाकले आहे. कोकणपट्टीतील दशांवतार नमन खेळे, मराठवाड्यातील ललित पंचमी, खानदेशातील तमाशा, तखतराव, विदर्भातील दंडार, लप्पक यासारखे लोककला प्रकार प्रादेशिकतेच कलात्मक आविष्कार आहेत; आणि कीर्तन, भारुड, गौळणी कला जागरण,गोंधळ या कला प्रकारांनी तर संपूर्ण महाराष्ट्र भूमी व्यापली आहे.

**समारोप:**

समाजाच्या विकासामध्ये फोरंजना महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर समाज एकजूट व एकसंग ठेवण्यासाठी सुद्धा ग्रामीण समाजातील मनोरंजनाला महत्व आहे. या मनोरंजनात्मक समाजव्यवस्था टिकवून ठेवण्याबरोबरच ग्रामीण लोकांना ताण-तणाव यातून मुक्ती देऊन मनोरंजन घडवून आणतात, ज्यामुळे समाजव्यवस्थेच्या समतोल राखला जातो. आधुनिक युगात मात्र विज्ञान आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे ग्रामीण

समाजातील कला व मनोरंजन लोप पावण्याच्या मार्गावर आहेत असे दिसून येते. या मनोरंजनात्मक कला संस्कृतीचे संरक्षण व संवर्धनासाठी व स्वयंसेवी संस्था, शासन दरबारी आत्मीयता असणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची:**


१. दांडेकर, व्ही. एम. आणि जगताप, एम. वी. (१९९०):- 'महाराष्ट्रातील ग्रामीण समाजरचना' पुणे.

२. भोसले, कुन्दा (१९९८) साहित्यशलाका, शब्दश्री टाईप सर्व्हिसेस, नाशीक -१

३. बाबर, सरोजिनी (१९९७):- दसरा-दिवाळी, महाराष्ट्र-लोकसाहित्यमाला पुष्प-२८

४. गुरुनाथ, नाडगोंडे (२००२):- ग्रामीण समाजशास्त्र; कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,

५. चौधरी, नारायण आणि आपटे, अविनाश (२००३) ग्रामीण राजकारण व संस्कृती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.